# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **24/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मंगरूळपीर हद्दीत मंगळवारी रात्री दरम्यान एक पिकअप वाहनांमध्ये अवैधरित्या सात जनावरे घेऊन जात असल्या बाबत पोलीसांना संशय आल्याने पोलीसांनी पाठलाग करून चोरट्या सह एकूण सात जनावरे ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला.

## गुंगारा, चकमा दिला, पण शेवटी चोर गाठला!

### ② अंमलदार येरमुले यांची शिताफी : चोराचा सिनेस्टाइल पाठलाग




## गुंगारा, चकमा दिला, पण शेवटी चोर गाठला!


देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪ दिसली ! नाही, गायब झाली..! अरे आत्ता तर होती.. चला जोरात.. आता भले काही होवो, याला गाठल्याशिवाय थांबायचं नाही ! तब्बल पावणेदोनशे किलोमीटर त्याने घुमवले, पण एका पोलिसाने जनावरे पळविणाऱ्याला अखेर एकदाचे गाठलेच ! अट्टल चोर आणि कर्तव्यकठोर पोलिस यांच्यामधला पाठलागाचा हा थरार मंगळवारी (ता. २०) रात्री अनुभवावयास मिळाला.

चकवत चकवत, गुंगारा देत पोलिसांच्या हातावर तुरी देऊ पाहणाऱ्या एका अट्टल चोरट्याला पोलिसांनी सिनेस्टाइल पाठलाग करून मोठ्या शिताफीने पकडले. काल मंगळवारी रात्री अंगावर शहारे आणणारा थरार घडला. त्याचे झाले असे, की एम. एच. २९ एटी १०८ या क्रमांकाची एक पिकअप गाडी अवैधरीत्या सात जनावरे कोंबून मंगरूळपीरहून वाशीमकडे येत होती. मंगरूळपीर पोलिसांना या वाहनाचा संशय आला, पण चक्क पोलिसांच्याच गाडीला धक्का देत चोरट्याने तेथून पोबारा केला. ही गाडी मंगरूळपीरहून निघाल्याची सूचना वायरलेसहून वाशीम पोलिसांना मिळाली. त्यावेळी पुसद नाका येथे रात्रीच्या गस्तीसाठी अमलदार सुरेश येरमुले आणि दशरथ राठोड हे दोघे कार्यरत होते. थंडीचे दिवस आणि पुढच्या गाडीत काय आहे माहिती नाही, अशा स्थितीत पोलिसांनी आपली चारचाकी तैनात ठेवून समोरच्या वाहनावर पाळत ठेवण्याचे ठरविले. चकमा देण्यात पटाईत असलेला हा चोर हाती लागणार नव्हताच, पण त्याच्या सुगाव्यावरच असलेल्या सुरेश येरमुले यांनी आडवाटांनी, कधी आडवळणांनी, कधी कच्च्या रस्त्याने तर कधी रस्ता सोडूनही.. असा काही त्याचा पाठलाग केला, की शेवटपर्यंत त्याला सोडला नाही. पाठलागाची ही झुंज कधी पोलिसांच्या बाजूने तर कधी चोरट्याच्या बाजूने होत राहिली. सापामुंगसाच्या खेळासारखीच पाठलागाची ही झटापट झाली. बात पावणेदोनशे किलोमीटर गाडी कशी पळाली हे समजलेही नाही. पण शेवटी मराठवाड्यातील येलदरी (जि. हिंगोली) येथे येरमुले यांनी या चोरट्याला कचाट्यात घेतलेच. त्या पिकअपमध्ये सात मुकी जनावरे होती. त्यांना वाचविण्याच्या कामी प्रयत्नांची शिकस्त करणारे अमलदार सुरेश येरमुले यांनी जीवाची बाजी लावून ही मोहीम अखेर फत्ते केली. मुक्या जनावरांचे प्राण पोलिसांमुळे वाचले.

# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **22/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मानोरा येथे 35 लाख रुपयाची सोयाबीनसह ट्रॅक विश्वासघात करून पळून घेऊन गेल्या बाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. ठाणेदार श्री सुनील जाधव व त्यांचे पथकाने 35 लाखाच्या मुद्देमालासह दोन आरोपीस ताब्यात घेऊन केली धडाकेबाज कारवाही.

## मानोरा पोलीसांची धडक कारवाई

# ३५ लाखाच्या सोयाबीन चोरट्यांना केले शिताफीने जेरबंद !



**प्रतिनिधी / वाशीम**

पोलीस स्टेशन मानोरा येथे अपराध नं.७९७/२०२१ कलम ४०६, ३४ भादंवि चा गुन्हा दाखल झालेला असून फिर्यादी गोपाल राधेश्याम हेडा, वय ५० वर्षे, व्यवसाय-धान्य व्यापार, रा.दिग्रस रोड, रामदेव नगर, मानोरा यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी तिरुपती ट्रान्सपोर्ट कंपनीचा १४ चाकी ट्रक क्र.CG१०AQ६०४० मध्ये ३०३ क्विंटल सोयाबीन अंदाजे किंमत २१४०६२४/- रुपयांचा माल फिर्यादीने हमालामार्फात भरून मानोरा येथून जयसिंगपूर सांगली येथे पाठविला होता. परंतु ट्रक वरील चालक नामे १) ईश्वरसिंह बापुलाल सौधिया, वय - २४ वर्षे, २) नारायणसिंह बिरमसिंह सौधिया, वय - ३५ वर्षे दोन्ही रा.खिलचीपूर, ता. खिलचीपूर, जि.राजगड, राज्य - मध्यप्रदेश यांनी फिर्यादीचा विश्वासघात करून ट्रक क्र.CG१०AQ६०४० व ट्रकमधील ३०३ क्विंटल सोयाबीन घेऊन गेले.

सदर गुन्ह्यामध्ये मा.पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.अपर पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, कारंजा यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस निरीक्षक श्री.सुनील जाधव यांच्या आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक महेश पुचेकर यांनी सदर गुन्ह्याचे तपासात गुप्त बातमीदार व तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे माहिती प्राप्त करून पोलीस स्टेशन मानोरा येथून पोहेकॉं./६२० संदीप बरडे, पोकॉं./४०८ शकील मुन्नीवाले, पोकॉं./१४२४ पंकज खाडे यांना पोलीस ठाणे खिलचीपूर, जिल्हा-राजगड, राज्य-मध्यप्रदेश येथे रवाना करून गुन्ह्यातील ट्रक क्र.एड१०AQ६०४० अंदाजे किंमत १५ लाख रुपये व ३०३ क्विंटल सोयाबीन किंमत २१४०६२४/- रुपये असा एकूण ३६,४६,६२४/- रुपयांचा मुद्देमाल खिलचीपूर येथून ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन मानोरा येथे परत आले. वरील आरोपितांना पोलीस स्टेशनला अटक करून मा.प्रथम वर्ग न्यायालय, मानोरा यांच्याकडून दि.२४ डिसेंबर २०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाला आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक महेश कुचेकर करीत आहेत.

याजनच कायक्रम आधकारा कायक्रमाच सचालन प्रा डा मगल इ ना विशष पारश्रम घतल धतावर वयाक्तक पात्र लाभाथा घर/झापडा/पालामध्य राहणार

## मानोरा पोलीसांची धडक कारवाई

# ३५ लाखाच्या सोयाबीन चोरट्यांना केले शिताफीने जेरबंद.



**मानोरा/प्रतिनिधी–**
दिनांक १६.१२.२०२१ रोजी पोलीस स्टेशन मानोरा येथे अपराध नं.७९७/२०२१ कलम ४०६, ३४ भादंवि चा गुन्हा दाखल झालेला असून फिर्यादी गोपाल राधेश्याम हेडा, वय ५० वर्षे, व्यवसाय धान्य व्यापार, रा.दिग्रस रोड, रामदेव नगर, मानोरा यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी तिरुपती ट्रान्सपोर्ट कंपनीचा १४ चाकी ट्रक क्र.उत्र१०ट६०४० मध्ये ३०३ क्विंटल सोयाबीन अंदाजे किंमत २१४०६२४/- रुपयांचा माल फिर्यादीने हमालामार्फात भरून मानोरा येथून जयसिंगपूर सांगली येथे पाठविला होता. परंतु ट्रक वरील चालक नामे १) ईश्वरसिंह बापुलाल सौधिया, वय २४ वर्षे, २) नारायणसिंह बिरमसिंह सौधिया, वय ३५ वर्षे दोन्ही रा.खिलचीपूर, ता. खिलचीपूर, जि.राजगड, राज्य मध्यप्रदेश यांनी फिर्यादीचा विश्वासघात करून ट्रक क्र.CG१0Q६0४0 व ट्रकमधील ३0३ क्विंटल सोयाबीन घेऊन गेले.

सदर गुन्ह्यामध्ये मा.पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.अपर पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, कारंजा यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस निरीक्षक श्री.सुनील जाधव यांच्या आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक महेश पुचेकर यांनी सदर गुन्ह्याचे तपासात गुप्त बातमीदार व तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे माहिती प्राप्त करून पोलीस स्टेशन मानोरा येथून पोहेकॉ./ ६२० संदीप बरडे, पोकॉ./४०८ शकील मुन्नीवाले, पोकॉ./१४२४ पंकज खाडे यांना पोलीस ठाणे खिलचीपूर, जिल्हा-राजगड, राज्य-मध्य प्रदेश येथे रवाना करून गुन्ह्यातील ट्रक क्र.उत्र१०ट६०४० अंदाजे किंमत १५ लाख रुपये व ३०३ क्विंटल सोयाबीन किंमत २१४०६२४/- रुपये असा एकूण ३६,४६,६२४/- रुपयांचा मुद्देमाल खिलचीपूर येथून ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन मानोरा येथे परत आले. वरील आरोपितांना पोलीस स्टेशनला अटक करून मा.प्रथम वर्ग न्यायालय, मानोरा यांच्याकडून दि.२४.१२.२०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाला आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक महेश कुचेकर करीत आहेत.

# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Washim Police**

**Date of Good Work done** :- **15/12/2021**

**Brief of the work done :-**

वाशिम पोलीस दलाचे वतीने सन 2021 मधील फिर्यादी यांचे गहाळ/ चोरी/ घरफोडी/ दरोडा मध्ये गेलेला माल पोलीसांकडून हस्तगत करण्यात आला असून आज रोजी एकूण 50 तक्रारदार यांचा 1.1 कोटी रुपयाचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे. असा अधिकाधिक गुन्हे उघडकीस आणून मुद्देमाल हस्तगत करून लवकरात लवकर फिर्यादीस परत करण्याचा प्रयत्न चालू राहील.





# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping distressed persons**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **12/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव हद्दीतील नागरतास येथून डायल 112 वर कॉल आला की, सदर ठिकाणी बेवारस बॅग पडलेली आहे त्यावरून डायल 112 चे ड्युटीवर असलेले पोलीस अंमलदार हे घटनास्थळी जाऊन त्यांनी बॅग ची तपासणी केली असता त्यात एक मोबाईल व रोख रक्कम 60000 रू मिळून आले सदर बॅग मालक सत्येश्र्वर अंभोरे यांचा शोध घेऊन मोबाईल व रक्कम परत केल्याने अंभोरे यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले.

## डायल ११२ मुळे मोबाईल व ६० हजारांची बॅग केली परत

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगाव** ■ येथील नागरतास रोडवर पाण्याच्या टाकीजवळ एक बेवारस पडलेली बॅग असल्याची माहिती ११२ नं. डायल करुन मालेगाव पोलिस स्टेशनला देण्यात आली असता, पोलिसांनी तातडीने ती बॅग घटना स्थळावरुन जप्त करुन बॅग हरवलेल्या व्यक्तीला ती परत केली. त्यामध्ये १ मोबाईल व ६० हजार रुपये रोख रक्कम होती.

सविस्तर असे की, १२ डिसेंबर रोजी रात्री साडे बारा वाजताचे सुमारास मालेगाव पोलिस स्टेशनच्या डायल ११२ वर एक सिएफएस आला की, पाण्याच्या टाकीजवळ एक बॅग बेवारस स्वरुपांत पडली आहे. या माहितीवरुन ठाणेदार प्रविण धुमाळ यांनी डायल ११२ वर ड्युटिवर असलेले पो.हे.कॉं. गजानन वाघ, व ना.पो.कॉ संदिप वायाळ यांना तात्काळ घटना स्थळी पाठविले. त्यांनी तेथे जाऊन बघितले असता एक बॅग त्यांना आढळून आली. त्यांनी त्या बॅगेची काळजी पूर्वक तपासणी करुन हातळली असता, त्या बॅगेत एक मोबाईल व ६० हजार रुपये व ओळख पत्र होते. ओळखपत्रावरुन संबंधीत बॅगच्या मालकाला सत्येश्वर भारत अंभोरे रा. मालेगाव यांना फोन केला व सदर रक्कम व मोबाईल अंभोरे यांना परत केली. त्यामुळे एवढी मोठी रक्कम पोलिसांनी परत केल्यामुळे अंभोरे यांनी पोलिस निरीक्षक धुमाळ व कर्मचारी गजानन वाणी व संदीप वायाळ यांचे आभार मानले. (श.प्र.)



> “नागरिक व महिलांनी काही समस्या, अडचणी अथवा संकट काळात मदत हवी, असल्यास ११२ नंबर डायल करुन पोलिसांना माहिती दिल्यास अवघ्या १० मिनीटात पोलिस घटनास्थळी येऊन त्याची दखल घेतील.
>
> **प्रविण धुमाळ,**
> ठाणेदार, मालेगाव.

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping children in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **11/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव हद्दीत पोलीस व सरकारी कामगार अधिकारी यांचे संयुक्त पथकाने दोन आस्थापना धारक यांचे विरुद्ध बाल कामगार अधिनियम प्रमाणे कार्यवाही केली असून या कारवाही मध्ये दोन बाल कामगारांना पिळवणूक होण्यापासून वाचविण्यात आले आहे. तसेच असे बाल कामगार कामाकरीता ठेऊ नयेत व असे बाल कामगार आढळून आल्यास माहिती देणे बाबत आवाहन करण्यात आले.

## Child labourers rescued in Malegaon

■ District Correspondent
WASHIM, Dec 11

ACTIVISTS working under the Child Labour Act raided two establishments at Malegaon and rescued two child labourers.

A raid was organided at Malegaon to put an end to the practice of child labour . During the raid, the task force found two child labourers working at two establishments. The task force rescued both the child labourers and registered a case in Malegaon Police Station against owners of the concerned establishments.

Under the Child Labour Act and Juvenile Labour (Prevention and Regulation) Act, people have been asked to informed a police officer or government labour officer and lodge a complaint if there is a child labour employed in any establishment People should cooperate to eradicate this practice of child labour and no child should be employed, the appeal was made by Labour Officer Gaurao Kumar Nalinde.

**पुण्य नगरी**

## बालकामगार प्रतिबंध कायद्यानुसार दोन प्रतिष्ठानांवर कारवाई

**मालेगाव** : बालकामगार यांचेकडून काम करून घेत असताना वाशीमच्या सरकारी कामगार अधिकारी यांनी धाड टाकून मालेगाव येथील दोन प्रतिष्ठावर १० डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेदरम्यान कारवाई केली. त्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

मालेगाव येथील शेलुफाटा नागरतास रस्त्यावर असलेल्या अग्नीहोत्री मोटर्समध्ये एक १६ वर्षीय व संतोष फेब्रीकेशन ॲन्ड भावना अग्रोवर्कर्स या दुकानामधे क्रमशः एक १६ वर्षीय आणी एक १७ वर्षीय अल्पवयीन बालक यांचे कडून काम करून घेत असल्याची माहिती मिळाली . त्यावरून सरकार तर्फे सरकारी कामगार अधिकारी गौरवकुमार रमेश नालींदे वाशीम यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह या दोन्ही प्रतिष्ठाणावर १० डिसेंबर रोजी १२ वाजताच्या सुमारास धाड टाकली. त्यावेळी हे दोन्ही बालक तेथे काम करताना आढळले. त्यावरून त्यांनी वरील दोन्ही प्रतिष्ठानाच्या मालकाविरुद्ध बाल कामगार प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९८६ चे कलम ३ व सुधारणा २०१६ चे कलम ३ (अ) नुसार कारवाई केली . याबाबत फिर्याद मालेगांव पोलीस स्टेशनला नोंदवण्यात आली असुन पुढील तपास सुरु आहे.

**Smart Bhandara-Gondiya**
Page No.4 December 11, 2021

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **04/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथील ठाणेदार जगदाळे व पोलीस स्टाफ यांनी निराधार व भटकणाऱ्या तीन चिमुकल्यांसह मातेला शोधून दिला नातेवाईकांचा आसरा.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **04/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन कारंजा शहर येथील ठाणेदार पो.नि.सोनवणे व त्यांचे पथकाने सराफा लाईन मधील जितेंद्र ज्वेलर्स येथील चोरी प्रकरणातील फरार झालेल्या आरोपी यांचा तांत्रिक पद्धतीने व शिताफीने शोध घेऊन एकूण 05 आरोपी अटक केले असून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लोकमत

## चोरी प्रकरणातील पाच आरोपी पोलिसांच्या ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा लाड :** येथील सराफा लाईनमधील जितेंद्र ज्वेलर्स या सराफा दुकानात १० नोव्हेंबर रोजी झालेल्या चोरी प्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे.

जितेंद्र ज्वेलर्समध्ये १० नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरट्यांनी १३ लाख १७ हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने लंपास केले. दुकानमालक कैलास कृष्णराव हिरूळकर यांनी या संदर्भात कारंजा शहर पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीत नमूद केले होते की, चोरट्यांनी दुकानातून ४ नेकलेस, २ ते ३ जोड कानातले, सोनलगडी, गजरा, बाळी, ओम, लॉकेट व मोड असे एकूण १४० ग्रॅम वजनाचे व ५ लाख ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, २० ते २५ जोड पैंजण, २० चांदीचे ब्रासलेट, करदोडा, फॅन्सी पायल, जोडवे, वरतन व चांदीचे चाळ, ७ लाख २० हजार रुपये किमतीची चांदी, ७ हजार रूपये नगदी असा एकूण १३ लाख १७ हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. अशा आशयाच्या तक्रारीवरून



विविध कलमान्वये गुन्हे दाखल करुन प्रकरण तपासात घेतले.

दरम्यान, घटनेच्या २२ दिवसांनी शहर पोलिसांनी या प्रकरणी जालना येथील भारतसिंग कपूरसिंग बाबरी, राहुल शरदराव वडगावकर, हरीश केवलराव पिच्छयानी, आकाश कैलास कुलते व विनोद श्रीनिवास देशमुख यांना अटक केली. तपास केला असता, आरोपींनी गुन्हा कबूल केला. त्यांच्याकडून एकूण मुद्देमालापैकी सोने वितळून तयार केलेली एक सोन्याची ३५ ग्रॅम वजनाची लगडी व १४ किलो ९० ग्रॅम वजनाचा चांदीचा गट असा २ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव, चरण चव्हाण, अनिल राठोड, अजय धनकर, अमोल कानडे, फिरोज खान, गोकुळ पांडुळे व रोहन

Hello Washim
Page No. 1 Dec 04, 2021
Powered by: erelego.com

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in Distress Situation**

**Police Station** :- **Washim Rural**

**Date of Good Work done** :- **03/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथील ठाणेदार सपोनि झळके व त्यांचे पथकाने पोलीस स्टेशन येथे दाखल बलात्काराच्या गुन्ह्यातील फरार झालेल्या आरोपीचा तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन अवघ्या 48 तासात अकोला येथून ताब्यात घेऊन गुन्ह्यातील दोन्ही आरोपीस शिताफीने अटक केली आहे.

## बलात्कार प्रकरणातील 'तो' आरोपी गजाआड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात वाशिम ग्रामीण पोलिसांना यश आले आहे.

या संदर्भात मिळालेली माहिती अशी की, २७ नोव्हेंबर रोजी पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथे फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला हजर होवून जबानी रिपोर्ट दिला होता की,त्याची अल्पवयीन पिडीत मुलगी हिने २६ नोव्हेंबर रोजी रात्री दरम्यान फिर्यादी हिला सांगितले कि, गावात राहणारे इसम नामे अनिल केशव इढोळे व आकाश मनोहर इढोळे रा.आडोळी, यानी ३१ ऑक्टोंबरचे अंदाजे १०. ३० वाजेदरम्यान घरासमोर उभी असताना या दोघानी जबरदस्तीने तोंड दाबून मो.सायकलवर बसवून अनिल इढोळे याचे शेतात नेले व जिवाने मारण्याची धमकी देवून तिच्यावर जबरी संभोग केला.तसेच तिला मो.सायकलवर आणून सोडत असताना आकाश इढोळे याने वाईट उद्देशाने तिची छेडछाड केली. अशा जबानी रिपोर्ट वरून वाशिम ग्रामीण पो.स्टे.येथे अप.क्र.३८८/२१ कलम ३७६ (३), ३५४, ३६३, ३५४(ड), ३२३,५०६,३४ भादवि सह कलम ४,६ बा.लै.अप.सं. अधि.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधिक्षक बच्चन सिंह सो याचे मार्गदर्शनाखाली सदर गंभीर गुन्हयातील मुख्य आरोपी नामे अनिल केशव इढोळे व सह आरोपी आकाश मनोहर इढोळे याचा शोध घेणे कामी तपास पथक नेमण्यात आले.तसेच आरोपीताचे मोबाईल क्रमांक मिळवून तांत्रिक मदत घेवून त्याचे सी.डी.आर. ।एस.डी.आर व टॉवर लोकेशन काढण्यात आले.त्याप्रमाणे आरोपीचा शोध घेतला असता २९ नोव्हेंबर रोजी यातील मुख्य आरोपी हा अकोला येथे असल्याची माहीती मिळाली त्यावरून तपास पथक तात्काळ अकोला येथे रवाना झाले.व अकोला येथून मुख्य आरोपी नामे अनिल केशव इढोळे याला शिताफिने ताब्यात घेण्यात आले. अवघ्या ४८ तासात यातील मुख्य आरोपीचा शोध घेवून त्यास अटक करण्यात आली. सदर कारवाई पोलीस अधिक्षक बच्चन सिंह , अपर पोलीस अधिकक्ष भामरे उपोअ यशवंत केडगे सो याचे मार्गदर्शनात विनोद झळके ठाणेदार वाशिम ग्रामीण,सपोनि महेश मच्छले, रमेश आडे, अशिष पाठक यांनी सहभाग नोंदविला.पुढील तपास सपोनि महेश मच्छले करीत आहे.(जि.प्र.)

# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **29/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन रिसोड येथे PS पथकाने दिनांक 26 नोव्हेंबर चे रात्री प्रभावी कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात असून त्या दरम्यान दोन तलवार बाळगणारे चार आरोपीस अटक करण्यात आली आहे. असे धारदार व घातक शस्त्र अवैधरित्या बाळगणारे यांचे विषयी माहिती देणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.

लोकमत

## दोन तलवारींसह चार आरोपींना अटक!

### रिसोड पोलिसांची कारवाई : कोम्बिंग मोहिमेस यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**रिसोड :** येथील पोलिसांनी २६ आणि २७ नोव्हेंबर रोजी कोम्बिंग मोहीम राबवून दोन तलवारींसह चार आरोपींना अटक केली. यासह इतरही विविध स्वरूपाच्या कारवाया करून आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळविले.

प्राप्त माहितीनुसार, रिसोडचे ठाणेदार सारंग नवलकार, सहायक पोलीस निरीक्षक गवई, सुबनावळ, पोलीस उपनिरीक्षक मुंढे, सुरगडे, गव्हाणे, बांगर, पाटील आदिंनी कोम्बिंग गस्तच्या विशेष मोहिमेत सहभाग नोंदवून कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ भादंवि सहकलम ४, २५ आर्म ॲक्टमधील आरोपी समाधान बंडू वाठोरे, नागेश समाधान वाठोरे, राजशेखर कोंडुजी वाठोरे आणि गजानन बबन राजगुरे या चार आरोपींना गुन्ह्यात वापरलेल्या दोन तलवारींसह अटक केली.

यासह कोम्बिंग गस्तीदरम्यान गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर धाड



टाकून २,२०० रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली. आरोपींना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले.

रिसोड शहरात व ग्रामीण भागात राहात असलेले निगराणी बदमाश फरार आरोपी, आर्म ॲक्टमधील गुन्हेगार, जातीय दंगलीतील गुन्हेगारांच्या राहत्या घराची झडती घेण्यात आली.

हिंगोली ते रिसोड रस्त्यावर नाकाबंदी करुन १३ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.

Hello Washim
Page No. 4 Nov 29, 2021
Powered by: erelego.com

# Washim District Police

**Nature of Work** :- **वाशिम जिल्हा पोलिस दलातील गुन्हेशोधक श्वान लुसी हीचे तपास कामात उत्कृष्ठ योगदान**

**Police Station** :- **Dog Unit**

**Date of Good Work done** :- **28/11/2021**

**Brief of the work done :-**

वाशिम जिल्हा पोलिस दलातील गुन्हेशोधक श्वान लुसी हीचे तपास कामात उत्कृष्ठ योगदान असून यापूर्वी अमरावती परिक्षेत्र व महाराष्ट्र पोलिस कर्तव्य मेळावा पुणे येथे आयोजित स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविले असून अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा पंजाब येथे होणाऱ्या स्पर्धे करीता श्वान लुसी हीची निवड झाली आहे.



देशोन्नती

## गुन्हेशोधक श्वान लुसी हिचे तपास कामात उत्कृष्ट योगदान - बच्चनसिंह

### गुन्हेगारी तपासण्यात श्वान लुसीचे कौतुकास्पद कामगिरी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ जिल्ह्यातील श्वान पथकात २०१७ पासुन कार्यरत असलेल्या गुन्हे शोधक श्वान लुसी हिचे तपास कामात उत्कृष्ट योगदान आहे, असे जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी सांगितले. संपुर्ण डॉग युनिट तसेच श्वान लुसी हिच्या कामगिरी बद्दल कौतुक करुन पुढेही अशाच प्रकारच्या भरीव कामगिरी करुन वाशिम जिल्ह्यास नावलौकीक मिळवुन द्यावी, अशी आशा व्यक्त केली आहे.

जिल्ह्यात सन २०१७ साली गुन्हे शोधक श्वान म्हणुन प्रशिक्षण करून लुसी जिल्ह्यात दाखल झाली. डॉग हॅन्डलर पोहवा शेजुळकर यांचेसह लुसी हिने आपले प्रशिक्षण पणाला लावुन २०१७ साली पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथील अपक्र ३२२/१७ कलम २९५ भादवी ग्राम चांदई येथे बौधपुरा येथील झेंड्याला चप्पल बांधुन विटंबना केली. त्या गुन्ह्यात चप्पल बांधलेल्या सुतळीच्या गाठीच्या वासावरुन आरोपीचे घर दाखवुन ओळख परेड दरम्यान आरोपी शोधुन गुन्हा उघडकीस आणला. सन २०१८ मध्ये पोस्टे वाशिम शहर अपक्र ३८९/१८ कलम ४५७,३८० भादवी मध्ये दुकानातील पेनस्टॅन्ड व लोखंडी हुकच्या वासावरुन आरोपीचे घर दाखवुन गुन्हा उघडकीस आणला. तर पोलीस स्टेशन रिसोड ग्राम महागाव येथील ३६७/१८ कलम ३९५, ४२७ भांदवीमध्ये डॉग हॅन्डलर पोहवा शेजुळकर यांनी लसीला चाबिचा वास दिला. लुसिने घटनास्थळावरुन मार्ग काढत दिड किलोमिटर अंतर कापुन आरोपीची ओढणी शोधुन गुन्हा उघडीकस आणला. सन २०२० मध्ये पोलीस स्टेशन शिपुर जैन ग्राम दुधाळा येथे गुन्ह्यात गर्दीत उभ्या असलेल्या व्यक्ती जवळ जावुन भुंकली तपास अधिकारी यांनी नगद आरोपीस ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणला. तर पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण ग्राम अडगाव खुर्द येथील गुन्ह्याचे तपासात काचेच्या गाडीच्या दोन तुकड्याच्या आधारावर महिला आरोपी शोधुन दिली व गुन्हा उघडकीस आणला. सन २०२१ मध्ये पोस्टे मालेगाव ग्राम नागरतासमध्ये महिलेचा गव्य आवळुन खुन करण्यात आला होता. डॉग हॅन्डलर शेजुळकर यांनी साध्या दोरीच्या वास श्वान लुसी हिला दाखविला असता आजुबाजुच्या परिसरात माग घेऊन आरोपीचे घरी जाऊन आरोपी ओळखुन तपास कामात मोलाची कामगिरी केली. श्वान लुसी हिने अनेक विविध घटनांमधील गुन्हे उघडकीस आनले असून, गुन्हे तपासनीच्या कामात मोलाची कामगिरी बजावली आहे. (का.प्र.)

**अ.भा.पो.कर्तव्य मेळावा स्पर्धे श्वान लुसीची निवड**

श्वान लुसी हिने आजपर्यंत अमरावती परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा स्पर्धामध्ये गोल्ड मेडल पटकावले असून, महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळावा स्पर्धा पुणे येथे सुध्दा गुन्हे शोधक या स्पर्धेत गोल्ड मेडल मिळविले आहे. तर पंजाब राज्यात हरियाना येथे होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा या स्पर्धे करीता श्वान लुसी हिची निवड झालेली आहे. अशी माहिती जि.पो.अ. बच्चन सिंह यांनी दिली.

**कौतुकास्पद कामगिरी**

सन २०१८ मध्ये मिसिंग २३/१८ मध्ये नामे आसीफ खान माजी सरपंच वाडेगाव यांची मिसिंग अकोला येथे दाखल झाली. श्वान पथकास कॉल मिळाल्यावर डॉग हॅन्डलर शेजुळकर यांनी श्वान लुसी हिने म्हैसाळा ते मुर्तीजापुर नदीच्या काळालगत माग काढत गाडीतील मिसिंग व्यक्तीच्या कपड्याच्या कॉलर व शर्टाच्या बाहीच्या वासावरुन तपास अधिकारी यांना पुलावरुन माग दाखवित घटनास्थळी नेऊन भुंकुन मिसिंग व्यक्तीला मारुन टाकलेल्या ठिकाण दाखवुन श्वान लुसी कौतुकास्पद कामगिरी केली.

Deshonnati Edition
Nov 28, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com



# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distressed situation**

**Police Station** :- **Karanja Gramin**

**Date of Good Work done** :- **22/11/2021**

**Brief of the work done :-**

जिल्हयात स्थापन करण्यात आलेल्या निर्भया पथकाने कारंजा येथील अल्पवयीन मुलीने ई मेल करून पोलिसांची मदत मागितली होती सदर मुलीच्या तक्रारीची तत्काळ दखल घेऊन पोलिसांनी तत्काळ मदत पोहचून त्यांचे तक्राररीचे निरसन केले असून त्यामुळे पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेचे पालकांनी आभार मानून समाधान व्यक्त केले. अशा संकटाचे वेळी 100/112 वर कॉल किंवा 8605878254 या क्रमांकावर व्हॉट्स ॲप संदेश करू शकतात.

लोकमत

# ई-मेल तक्रारीची पोलिसांकडून दखल; कॉल करणाऱ्याला दिली समज!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : अनोळखी व्यक्तीकडून वारंवार फोन तसेच व्हिडिओ कॉल येत असल्याची तक्रार कारंजा येथील नववीच्या मुलीने ई-मेलने पोलिसांकडे करताच, याची दखल घेत मोबाइल क्रमांकाच्या लोकेशनद्वारे कॉल करणाऱ्याचा शोध घेण्यात आला. मोबाइल क्रमांकातील आकडे हे थोडेफार सारखेच असल्याने चुकून कॉल लागल्याचे स्पष्टीकरण संबंधित इसमाने दिले.

कारंजा येथे इयत्ता नववीत शिक्षण घेणाऱ्या एका मुलीच्या मोबाइलवर एक अनोळखी व्यक्ती वारंवार फोन करून तसेच व्हिडिओ कॉल करून त्रास देत होता. या मुलीने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या ई-मेलवर या घटनेची माहिती दिली. पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी तत्काळ मुलीच्या तक्रारीची दखल घेऊन पोलीस यंत्रणा याकामी लावली. महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी कार्यरत असलेल्या कारंजा येथील निर्भया पथकाला तत्काळ सूचना करून या मुलीच्या मदतीसाठी जाण्याचे निर्देश दिले. कारंजा येथील निर्भया पथकाने मुलीची तक्रार समजून घेतली. सायबर सेल वाशिमकडून संबंधित इसमाचे लोकेशन घेतले असता, गुजरात राज्यातील पिपोदरा येथील अनोळखी इसम असल्याचे निष्पन्न झाले. कारंजा येथील नववीत शिकणाऱ्या मुलीच्या मोबाइल क्रमांकातील आकडे हे थोडेफार सारखेच असल्याने चुकून कॉल लागल्याचे त्या अनोळखी व्यक्तीने सांगितले. अनोळखी व्यक्ती व त्याच्या लोकेशनबाबतची माहिती कारंजा येथील निर्भया पथकाने मुलीच्या घरी जाऊन तिच्या आई-वडिलांना दिली.

## .. तर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा

ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनात कारंजा (ग्रामीण) पोलीस निरीक्षक धंदर, पोलीस उपनिरीक्षक धोंगडे, अंभोरे, पोलीस हवालदार महेंद्र रजोदिया व चमूने केली. जर कोणी व्यक्ती महिला व मुलींना त्रास देत असेल, पाठलाग करीत असेल तर त्यांनी तत्काळ पोलीस हेल्पलाइन नंबर १०० किंवा ११२ तसेच वाशिम नियंत्रण कक्ष येथे संपर्क साधावा असे आवाहन वाशिम पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या स्थानिक गुन्हे शाखेने केले.

Hello Washim
Page No. 1 Nov 23, 2021
Powered by: erelego.com

# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **20/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन रिसोड येथील ठाणेदार श्री नवलकर व त्यांचे पथकाने पोलिस स्टेशन येथे दाखल चोरीच्या प्रकरणातील अनोळखी आरोपीचा शिताफीने शोध घेऊन तीन आरोपी अटक करून गुन्हयातील माल जप्त केला आहे.

देशोन्नती

## गाडी पंक्चर करुन लुटणारी टोळी रिसोड पोलिसांच्या जाळयात

### १ लाख २ हजाराचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ एस.टी.चे सेवानिवृत्त कर्मचारी किसनराव थोत्रे यांची मोटर सायकल पंक्चर करुन गाडीमधील तीन लाखाची बॅग घेऊन पोबारा करणाऱ्या टोळीला अटक करण्यात रिसोड पोलिसांना यश आले. ही लुटमारीची घटना ३ सप्टेंबर २०२१ रोजी रिसोड येथे घडली होती. त्यावेळी पोलिसांनी संबंधित अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल केला होता.

जिल्हा पोलिस अधिक्षक बच्चनसिंग यांनी लुटमार करणाऱ्या टोळीला पकडण्यासाठी रिसोड पोलिसांनी कसोशीचे प्रयत्न करावे या अनुषंगाने पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा तपास चॅलेंज म्हणून स्विकारण्याचे आवाहन केले. रिसोड पोलिस स्टेशनचे ठाणेदार सारंग नवलकार यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन या प्रकरणातील आरोपी रुपेश गुलाब लहाने वय २६ रा. जिजाऊ नगर रिसोड, संजय श्रीराम अंभोरे वय ३५ रा. गोवर्धन, देवानंद राजाराम पडघान वय २० रा. गजानन नगर रिसोड, रामा श्रवण मानमोठे वय २६ रा. माणुसकीनगर रिसोड यांना अटक करुन संबंधित गुन्ह्याबाबत कसुन चौकशी केली असता आरोपींनी सदर गुन्ह्याची कबुली दिली.

विशेष म्हणजे गुन्ह्यामध्ये चोरी गेलेल्या ३ लाखापैकी ६० हजार रुपये बॅगसह व गुन्ह्यामध्ये वापरलेली मोटरसायकल क्र. एम.एच.२८ - वाय ३५२९ किंमत ४२ हजार असा एकूण १ लाख २ हजाराचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आला. अशी माहिती ठाणेदार सारंग नवलकार यांनी दिली. सदर कारवाईमुळे रिसोड परिसरात घडलेल्या अशा प्रकारच्या घटना उघडकिस येण्याची शक्यता बळावली आहे. (जि.प्र.)

Deshonnati Edition
Nov 20, 2021 Page No. 1
Powered by : eReleGo.com

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distressed situation**

**Police Station** :- **Ansing**

**Date of Good Work done** :- **18/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन अनसिग हद्दीतील ग्राम सापळी येथे बाल विवाह होत असले बाबत डायल 112 वर कॉल आल्याने त्वरित पोलिस घटनास्थळी दाखल होऊन बाल विवाह प्रतिबंध अधिकारी यांना संपर्क करून पोलिस व ग्राम प्रशासन यांचे समन्वयाने अल्पवयीन मुलीचा विवाह थाबविण्यात यश आले आहे. अशा तातडीचे व संकटकाळी डायल 112 वर कॉल करणे बाबत मा पोलिस अधीक्षक श्री बच्चन सिंह (IPS) यांनी आवाहन केले

लोकमत

## अल्पवयीन बालिकेचा विवाह रोखला

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** गुप्त माहिती मिळताच घटनास्थळ गाठून महिला व बालविकास विभागाने वाशिम तालुक्यातील सापळी येथे होणारा बालविवाह रोखल्याची घटना १६ नोव्हेंबर रोजी घडली.

वाशिम तालुक्यातील अनसिंग पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सापळी येथे १६ नोव्हेंबर रोजी बालविवाह होत असल्याची माहिती ग्रामसेवक धम्मानंद भगत यांनी महिला व बालविकास अधिकारी अलोक अग्रहरी यांना भ्रमणध्वनीवर दिली. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून अग्रहरी यांनी बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अन्य अधिकारी यांना तत्काळ घटनास्थळी जाऊन बालविवाह थांबविण्याचे आदेश दिले. हेल्पलाईन क्रमांक ११२ या टोल फ्री क्रमांकाच्या सेवेकडून बालविवाह होत असल्याची माहिती मिळाली आणि तत्काळ अनसिंग पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आशिष देशमुख व चमू यांच्यासह संबंधित सर्व यंत्रणांची चमूने सापळी येथील अल्पवयीन बालिका तसेच आई व मुलांकडील कुटुंबाला बालविवाह न करण्याबाबत व त्यांचे भविष्यातील होणारे दुष्परिणाम याबाबत समुपदेशन केले. त्यानुसार बालविवाह रोखण्यात आला.



### हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा

जिल्ह्यात काही ठिकाणी बालविवाह होत असल्याची माहिती हेल्पलाइन क्रमांकावर मिळाली होती. त्यानुसार यापूर्वीदेखील बालविवाह रोखले आहेत. बालविवाह होत असल्यास चाईल्ड लाईनच्या १०९८ व पोलीस हेल्पलाईन ११२ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधून नागरीकांनी माहिती दयावी. असे आवाहन प्रभारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अलोक अग्रहरी यांनी केले आहे.

Hello Washim
Page No. 3 Nov 18, 2021
Powered by: erelego.com

# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **12/11/2021**

**Brief of the work done :-**

मा पोलिस अधीक्षक श्री बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली स्था. गु.शा. यांचे पथकाने पो. स्टेशन रिसोड येथे दाखल जबरी चोरी च्या गुन्ह्यातील आरोपिंतांचा शिताफीने शोध घेऊन 24 तासात तीन आरोपी अटक करून गुन्ह्यातील चोरी गेलेला मुद्देमाल हस्तगत केले

लोकमत

तीन आरोपी जेरबंद : पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## जबरी चोरीचा २४ तासांत लागला छडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** कमी किमतीत सोने देण्याची बतावणी करून तीन अनोळखी व्यक्तींनी अभिजित गणेश धनबर व गौरव देशमुख या दोघांना मारहाण करून पाच लाखांची रक्कम लुटल्याची घटना १० नोव्हेंबरला घडली. दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी तत्काळ दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नेमले. पथकानेही कार्यतत्परता दाखवून अवघ्या २४ तासांत चोरीचा छडा लावला. तीन आरोपींना जेरबंद करण्यासह पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



प्राप्त माहितीनुसार, १० नोव्हेंबरला फिर्यादी अभिजित धनबर यांनी रिसोड पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीत नमूद केले की, त्यांचा मित्र गौरव देशमुखच्या मोबाईलवर एकाने कॉल करून माझ्याजवळ अर्धा किलो सोने आहे व ते तुम्हाला पाच लाख रुपयांत देतो, अशी बतावणी केली. फायदा होणार असल्याने मी व गौरव देशमुख ठरावीक ठिकाणी पोहोचलो असता, तीन अनोळखी व्यक्तींनी काठीने मारहाण करून पाच लाख रुपये जबरीने हिसकावून घेतले व पोबारा केला. अशा तक्रारीवरून रिसोड पोलिसांनी भादंविचे कलम ३९४, ३४ अन्वये अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल केला.

दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी घटनेची तत्काळ दखल घेत स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षकांना तपासाबाबत आदेश देऊन तथा विशेष पथक स्थापन करून रवाना केले. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी सुनील मनोहर भोसले, संजय बबन भोसले आणि राजू मनोहर भोसले या तिघांना जेरबंद केले. पोलिसी खाक्या दाखविताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ४ लाख ४७ हजार ५०० रुपये रोख व एक दुचाकी वाहन (किंमत ५० हजार) असा ४ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. घटनेचा पुढील तपास रिसोड पोलीस करीत आहे.

Hello Washim
Page No. 1 Nov 12, 2021
Powered by: erelego.com

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distressed situation**

**Police Station** :- **Ansing**

**Date of Good Work done** :- **03/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन अनसिंग येथील ठाणेदार श्रीमती नैना पोहेकर यांनी व त्यांचे निर्भया पथकाने पो स्टे. हद्दीतील 20 वर्षीय मुलगी रागाचे भरात घरातून निघून गेल्याने अवघ्या काही तासात शोध घेऊन सदर मुलीचे समुपदेशन करून आई वडिलांचे ताब्यात देण्यात आले आहे



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Children**

**Police Station** :- **Ansing**

**Date of Good Work done** :- **30/10/2021**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. अनसिंग हद्दीत निर्भया पथकाच्या मपोका शिवनंदा पांढरे ह्यांना बस स्टँड परिसरात दोन वर्षाची अनोळखी मुलगी बेवारस स्थितीत मिळून आल्याने निर्भया पथकाने नातेवाईकांचा शोध घेऊन तिची आई गंगा इंदल चव्हाण यांचे ताब्यात दिले.






# Washim District Police

**Nature of Work** :- **Assisting Senior Citizens**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **23/10/2021**

**Brief of the work done :-**

वाशिम जिल्हयातील पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथील अंमलदार यांनी मंगरूळपीर न्यायालयात साक्ष देण्याकरिता आलेले साक्षीदार नामे श्री महादेव यशवंत मनोहर यांना अचानक हृदय विकाराचा झटका आल्याने न्यायालयातील अंमलदार आसिफ खान व म पो अंमलदार वैशाली भिसे यांनी प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचाराकरिता अकोला येथे रेफर केले असून पोलीसांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे साक्षीदार यांचा जीव वाचविण्यात यश आले आहे.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Washim**

**Date of Good Work done** :- **20/10/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन वाशिम शहरचे ठाणेदार श्री. बावनकर व तपास पथकाने शिताफीने तपास करून दोन मोटार सायकल चोर यांना अटक करून त्यांचे कडून 4 मोटार सायकल किंमत 1,30,000 रू मुद्देमाल हस्तगत केला आहे.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters With Ganja**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **18/10/2021**

**Brief of the work done :-**

मा. पोलिस अधीक्षक श्री. बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस स्टेशन रिसोड येथील ठाणेदार श्री नवलकार व त्यांचे पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आयशर ट्रक मध्ये एकूण 56 कट्टे (पोते), 1150 Kilogram गांजा किंमत 3 कोटी 45 लाख रुपये चा माल मिळाल्याने जप्त केले असून अंमली पदार्थांचे विरुद्ध अशा प्रकारच्या कार्यवाही सुरू राहणार आहे.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **18/10/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव हद्दीतून मोटार सायकल चोरीची घटना घडल्यानंतर ठाणेदार श्री. धुमाळ यांनी व अंमलदार यांनी शिताफीने तपास करून अवघ्या 24 तासात अकोला येथून मोटार सायकल सह आरोपीस अटक केले आहे.

पुण्य नगरी

## मोटरसायकल चोरटा गजाआड

**मालेगाव** : शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधून १६ ऑक्टोंबरच्या रात्री दरम्यान चोरट्यांनी एक लाख रुपये किंमतीची पल्सर मोटर सायकल चोरून नेली होती. याप्रकरणी मालेगाव पोलिसांनी जलद गतीने तपास लावून अवघ्या चोवीस तासाच्या आत अकोला येथून चोरलेली मोटरसायकल सह आरोपीस गजाआड केले.

प्रभाग क्रमांक ६ मधील आजाद खा पठाण यांची एम.एस.-३७-ए.बी.०४०५ क्रमांकची दुचाकी चोरून नेली होती. याबाबत ठाणेदार प्रवीण धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ ज्ञानदेव भगत गजानन झगरे यांनी अकोला पोलिसांना माहिती दिली. यावरून डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी सदर संशयास्पद मोटरसायकल व युवक अकोल्यात जास्त असल्याची माहिती दिली. सदर घटनेची माहिती मिळताच पोहेकॉ ज्ञानदेव भगत गजानन झगरे यांनी अकोला गाठून आरोपी विशाल अंभोरे (वय २०) रा.वेणी ता. लोणार जि. बुलडाणा यास मोटरसायकल ताब्यात घेऊन मालेगावला आणले.त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

Smart Bhandara-Gondiya

Page No.4 October 18, 2021

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Senior Citizens**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **12/10/2021**

**Brief of the work done :-**

अमरावती जिल्ह्यातील पोलिस स्टेशन रहिमापुर येथे अपहरणाचा गुन्हा दाखल असून त्यातील आरोपी हा एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून मालेगाव जिल्हा वाशिम येथे आल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने मालेगाव पोलिसांनी सदर आरोपीचा शिताफीने शोध घेऊन सिनेस्टाईल पाठलाग करून आरोपीस ताब्यात घेऊन पीडित मुलीसह अमरावती पोलिसांचे ताब्यात देण्यात आले आहे.



पुण्य नगरी

# खाकीतील माणुसकी वयोवृद्ध निराधार महिलेसाठी ठरली वरदान

**किरण पखाले**

**मालेगाव**, दि. १३

पोलीस म्हटलं की खाकी वर्दीतील तापट स्वभावाचा कडक शब्दात बोलणारा व्यक्ती अशी प्रतिमा सर्वसामान्य नागरिकांमध्ये आहे. नको त्या भानगडी मागे लागतील या धाकाने अनेक जण पोलिसांना मदत मागण्याचे देखील टाळतात. पोलिसांना कर्तव्यासाठी वेळप्रसंगी थोडे कठोर व्हावे लागते परंतु तरीही खाकीवर्दीआड एक माणूसच असतो आणि त्यालाही भावना असतात. आपल्या कर्तव्यासाठी कठोर बनलेला हा वर्दीतला माणूस वेळप्रसंगी तितकाच मृद आणि हळुवार मनाचा असतो आणि खाकीतही माणुसकी पाझरत असते, याचाच प्रत्यय मालेगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रवीण धुमाळ यांच्या प्रत्यक्ष कृतीतून आला.

शहरातील जुन्या बस स्थानकावर असलेल्या प्रवासी निवारा मध्ये मागील अनेक दिवसापासू एक ८० वर्षीय वयोवृद्ध महिला रात्र दिवस एकाच जागेवर खितपत पडून होती. उन, वारा, पाऊस, अंधार हे सर्व सोसत ती पडून होती. शिवाय ही महिला कोणाला काहीच बोलत नव्हती. उपाशीतापाशी अनेक दिवसांपासून प्रवासी निवाऱ्यात एका बाकड्यावर पडून राहत होती. याबाबतचे वृत्त दै. 'पुण्य नगरी' १० ऑक्टोंबरच्या अंकात प्रकाशित केले होते. सदर वृत्ताची दखल घेत ठाणेदार प्रवीण धुमाळ यांनी १२ ऑक्टोबर रोजी सदर वृद्ध महिलेची प्रत्यक्ष घटनास्थळी पोहचून माहिती घेतली आणि तीला वाशीम जिल्हा रुग्णाल्यात उपचारार्थ दाखल केले. परंतु सदर महिलेला तीचे नाव, नातेवाईक, घरचा पत्ता याबाबत विचारणा केली असता ती काहीच सांगत नसल्याने रुग्णाल्यात तीला दाखल करुन घेण्यास नकार दिला जात होता. त्यावेळी ठाणेदार धुमाळ यांनी आपण स्वतः या महिलेची जबाबदारी घेत असल्याचे सांगुन कर्तव्यावर उपस्थित डॉक्टर, परिचारिका यांना स्वतःचा मोबाईल नंबर दिला.



त्यानंतर दुसऱ्या दिवशीसुद्धा ठाणेदार प्रवीण धुमाळ यांनी पोहेकॉ. कैलास कोकाटे, आशिष बिडवे, संदीप वायाळ व पोलीस मित्र विजय सुरडकर यांना जिल्हा सामान्य रुग्णालय मध्ये पाठवून सदर वृद्धेच्या उपचाराबाबत माहिती घेतली. फळ, ब्लॅंकेट व इतर आवश्यक ते कपडे देखील पाठवून उपचारासाठी बाहेरुन काही औषधी आणण्याची गरज असल्यास ती देखील उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी घेली. एका अनोखळी महिलेच्या मदतीसाठी धाऊन जात ठाणेदार धुमाळ यांनी खाकीतील माणुसकीचे दर्शन घडविले आहे.

# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Senior Citizens**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **13/10/2021**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन मालेगाव चे ठाणेदार श्री धुमाळ यांना मालेगाव शहरात गस्त करीत असताना वयोवृध्द/निराधार आजारी महिला रस्त्याच्याकडेला पडलेल्या अवस्तेत मिळून आल्याने त्यांनी सदर वृध्द महिला हिला तात्काळ उचलून उपचाराकरिता १०८ रुग्णवाहिके चे मदतीने सरकारी दवाखाना वाशिम दाखल केले असून त्यांनी कर्तव्य पार पाडत असताना खाकी तील माणुसकीचे दर्शन घडविले



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **08/10/2021**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. वाशिम श. येथे दाखल करण्यात आलेल्या घरफोडी च्या गुन्हयाचा शिताफीने तपास करून गुन्हे प्रकटीकरण पथकाने “12 तासाचे आत” गुन्हा उघडकीस आणला असून तीन आरोपी अटक करून आरोपीकडून चोरी गेलेले अल्युमिनियम किंमत अंदाजे 2,94,000 रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Assisting Senior Citizens**

**Police Station** :- **Washim Police**

**Date of Good Work done** :- **06/10/2021**

**Brief of the work done :-**

वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक 05.10.2021 रोजी जिल्हा परिषद व नगर परिषद पोट निवडणूक पार पडली असून त्यादरम्यान वयोवृध्द/ निराधार ज्येष्ठ नागरिक यांना मतदानाचा हक्क बजावल्यानंतर पाऊस सुरू असल्याने बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी दिला मदतीचा हात



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **02/10/2021**

**Brief of the work done :-**

स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांनी वाशिम जिल्हयातील चोरी गेलेल्या मोटार सायकलचा शिताफीने तपास करून दोन मोटार सायकल चोरास अटक करून त्यांचे कडून एकूण 14 मोटार सायकल जप्त करून 4,30,000 रू मुद्देमाल हस्तगत केला आहे.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **27/09/2021**

**Brief of the work done :-**

स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांनी मा पोलिस अधीक्षक श्री बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली वाशिम शहर हद्दीत अनधिकृत रित्या गुटखा बाळगल्याने धाड टाकून 1,50,939 रू चा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपी अटक केले आहे.



# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping injured/ distressed persons**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **27/09/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन कारंजा शहर PI सोनवणे व स्टाफ यांनी अपघात ग्रस्त दोन युवकांना नेट सेट परीक्षेसाठी अमरावती येथे पोहचून दाखविले माणुसकीचे दर्शन सर्व स्तरातून होत आहे पोलीसांचे कौतुक.



03 मातृभूमि | वाशिम परिसर

# सास कंट्रोल रुम आणि पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने झाले शक्य

## अपघाग्रस्त युवकाला देता आली सेट-नेटची परिक्षा!

# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **26/09/2021**

**Brief of the work done :-**

मा. पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. मंगरूळपीर PI जगदाळे व स्टाफ यांनी मंगरूळपीर शहरामध्ये व ग्रामीण भागात झालेल्या पशुधन/ गोवंशच्या चोरीचा शिताफीने तपास करून चार आरोपी अटक केले 3,50,000 रु. मुद्देमाल जप्त केला.

